<table>
<tr>
<td>MHPU120009972023</td>
<td><u>नियमित दिवाणी दावा क्र.१४९/२०२३ मधील</u><br><u>निशाणी क्रमांक ६५ वरील आदेश</u><br>(शिला प्रताप कोंडे देशमुख व इतर विरुध्द सिंधुबाई प्रतापराव जगताप व इतर )</td>
</tr>
</table>

वादी यांनी प्रस्तुचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ या दि.०४.०७.२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दि.०२.१०.२०२४ रोजी दावा अबेट झालेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मुदत कायद्याच्या आर्टिकल १२१ प्रमाणे वारस अबेटमेंट रद्द करण्याकरीता ६० दिवसाचा अवधी प्रदान करण्यात आलेला आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ यांच्या वकीलांनी दाखल केलेली पुरसिस ही वादीच्या लक्षात न आल्यामुळे सदरचा विलंब झालेला आहे. यापूर्वी वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याकरीता अर्ज दाखल केलेला होता. त्यावेळी प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्याच्या अवलोकनानंतर सदरचा दावा प्रतिवादी क्र.१ च्या विरोधात अबेट झाल्याचे वादीच्या लक्षात आले. त्यामुळे तांत्रीकता टाळण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.१ च्या कायदेशीर प्रतिनिधींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी या न्यायालयात उपस्थित असतात. त्यामुळे त्यांना कामकाजाबाबतची माहिती आहे. सबब, त्यांनी कथन

केलेले कारण हे खोटे व खोडसाळ आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**४.** प्रस्तुतचा अर्ज हा विलंब माफ करण्याकरीता केलेला आहे. कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार विलंबाकरीता दिलेले कारण हे योग्य व संयुक्तिक असल्यास विलंब माफ करण्याची तरतूद आहे. अभिलेखाचे अवलोकन करता यापूर्वीदेखील वादी यांनी प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याकरीता अर्ज दाखल केला होता. परंतु त्या अर्जासोबत विलंब माफीचा अर्ज व अबेटमेंट रद्द करण्याकरीता अर्ज नसल्यामुळे सदरचा अर्ज वादी यांनी चालविलेला नाही. तसेच उभय पक्षकारांचे दावा मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे वादी यांनी कथन केलेले कारण हे प्रथमदर्शनी संयुक्तीक दिसून येते. सबब, दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेकरीता प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे उर्वरित प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

१. वादीचा अर्ज (नि.६५) मंजुर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT Date: 2025.09.29 18:00:48 +0530

ठिकाण – भोर    ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २९.०९.२०२५    दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

भोर.